SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004, दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000, www.unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

**विद्यार्थी विकास विभाग**

Dr. T. M. Chougale
Director, Students' Development
Phone – (0231) 2609175, 2609475
Email: dsw@unishivaji.ac.in

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/९५ दि. २५/०७/२०२५

प्रति,
**मा. प्राचार्य/संचालक,**
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषयः— पंडीत दिनदयाळ उपाध्यायजी यांच्या एकात्म मानवदर्शन हिरक महोत्सवीनिमित्त विविध कार्यक्रम व उपक्रम राबविण्याच्या अनुषंगाने समन्वयक नेमण्याबाबत.**

महोदय/महोदया,

महाराष्ट्र सरकारने राज्यभरात पंडित दिनदयाळ उपाध्यायजी यांच्या कार्यक्रमांचे स्मरण करण्यासाठी एकात्म मानवदर्शनवर हिरक महोत्सवी समिती स्थापन केली आहे. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन दि. २२ एप्रिल, २०२५ रोजी मुंबईतील रुईया कॉलेज येथे संपन्न झाला आहे. सदर कार्यक्रमामध्ये सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालयांना राष्ट्रीय अभिमान आणि वसुधैव कुटंबकमची भावना जागृत करण्यासाठी या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन मा. कुलपती कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

एकात्म मानवदर्शन हिरक महोत्सवी उपक्रमांसाठी खालीलप्रमाणे कृती करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

१. एकात्म मानवदर्शन या विषयांवर निबंध, वत्कृत्व, वादविवाद, पथनाटय, लघुपट, रील आणि कविता या विषयांवर स्पर्धा आयोजित करण्यात यावी.
२. किमान ३५ टक्के विद्यार्थ्यांचा सहभाग सुनिश्चित करावा. विद्यार्थी सहभागाच्या नोंदी ठेवण्यात याव्यात.
३. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व विजेत्यांना बक्षिसे आणि गुणवत्ता प्रमाणपत्रे देण्यात यावीत.
४. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती दि. २५/०९/२०२५ रोजी (दि. २५/०९/१९१६) आणि पुण्यतीथी दि. ११/०२/२०२६ (दि. ११/०२/१९६८) योग्य घटनांद्वारे पाळणे.
५. सर्व संस्थात्मक ग्रंथालयांमध्ये पंडित दीनदयाळ उपाध्यायजी यांच्या वरील संबंधित साहित्य उपलब्ध करण्यात यावे.
६. सदर उपक्रम दि. २२ एप्रिल, २०२६ पर्यंत सुरु ठेवावेत.
७. कार्यक्रमाच्या अनुषंगाने होणारे सर्व खर्च संबंधित महाविद्यालयाने करावेत.

तरी आपल्या महाविद्यालयामध्ये कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून एका शिक्षकाची नियुक्त करण्यात यावा. सदर नियुक्त शिक्षकाची माहिती खाली दिलेल्या गुगल लिंक दि. २८/०७/२०२५ पर्यंत भरावी.

गुगल लिंक : https://forms.gle/4wisCND3hPF24VD79

**सदरची गुगल लिंक ही महाविद्यालयांच्या ई—मेलद्वारे ओपन करावयाची आहे. शिक्षकांच्या मोबाईल नंबर व ई—मेलवरुन नोंदणी करता येणार नाही. याची नोंद घ्यावी.**

कळावे,

आपला विश्वासू

प्र संचालक
विद्यार्थी विकास